Pune Police

प्रेसनोट

दिनांक - ०५/१२/२०१६

खाजगी सुरक्षा रक्षक (बाऊन्सर) म्हणुन काम करणारे उत्तरप्रदेश मधील शस्त्र परवानाधारक दोघे जेरबंद

दिनांक ०४-१२-२०१६ रोजी दुपारी १२-०० वा. आदय क्रान्ती वीर उमाजी नाईक स्मारक ९३१ शुक्रवार पेठ, पुणे याठिकाणी वर्धापन दिनानिमीत्त श्री दौलत नाना शितोळे अध्यक्ष अखिल महाराष्ट्र बेरड रामोशी समाज कृती समिती यांनी बैठक आयोजीत केली होती . सदर बैठकीस ते व त्यांचे कार्यकर्ते तसेच आप्पासाहेब गंगाराम चव्हाण अध्यक्ष - क्रान्तीवीर उमाजी नाईक क्षत्रिय रामोशी संघटना यांच्या कार्यकर्त्यामध्ये वाद निर्माण झाला होता . त्यावेळी खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी बंदोवस्तासाठी हजर होते. सदर मिटींग चालु असताना दोन्ही पार्टीच्या कार्यकर्त्यामध्ये वादावादी होवून गोंधळ सुरू झाला, पोलीसांनी हस्तक्षेप केला . त्यावेळी सदरठिकाणी **सफारी ड्रेस घातलेले दोन खाजगी सुरक्षा रक्षक (बाऊन्सर) हजर होते त्यांचेकडे रिव्हॉल्व्हर असल्याबाबत माहीती पोलीसांना मिळाली** त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले व त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आपली नावे १) रामधिरज रामप्रसाद चौरसिया वय ४१ रा.मुळ गाव बिटवाजीदपुर पोलीस स्टेशन कोतवाली देहात तालुका - सुल्तानपुर उत्तर प्रदेश सध्या रा. दौलत नाना शितोळे यांचे घरी मु पो शिंदोडे ता.शिरूर जि.पुणे असे असल्याचे सांगितले त्याचे ताब्यात १ रिव्हॉल्वर व १० राउंड मिळून आले. त्यांचेकडे चौकशी करता त्याने दौलत नाना शितोळे रा - शिदोडी ता शिरूर जि - पुणे यांचेकडे त्यांचा खाजगी बॉडीगार्ड म्हणून काम करत असल्याचे व त्यापोटी वीस ते पंचवीस हजार रुपये पगार मिळतो असे सांगितले. अ.नं. २) कामाख्या नारायण बुदधीसागर सिंग वय - ४६ रा - मुपो - गराम सिहाएजपार, तालुका - बासगाव गगहा पोलीस स्टेशन जि - गोरखपूर उत्तर प्रदेश सध्या रा - ४९/१६ आबेगांव बु पुणे याचे ताब्यात १ रिव्हॉल्वर व ६ रांउड मिळाले आहे. त्याचेकडे चौकशी करता त्याने अनंता उर्फ बापू चंद्रकंत चव्हाण रा - स.नं ४९/१६ आबेगांव ता हवेली जि पुणे यांचेकडे खाजगी बॉडीगार्ड म्हणून करत असल्याचे व त्याकरिता वीस ते पंचवीस हजार रुपये पगार मिळतो सांगितले आहे.

त्यांच्याकडे असलेले शस्त्र परवाना चेक केला असता रामधिरज रामप्रसाद चौरसिया यांचा शस्त्र परवाना क्रमांक ७५९/जुन/सुलतानपुर व परवाना क्रंमाक – ८४०९/ थाना- गगहा जिल्हा - गोरखपुर उत्तरप्रदेश हे येथील प्रभारी अधिकारी आयुध जिल्हा मॅजी गोरखपुर यांनी स्वसरंक्षणार्थ दिलेले आहे. दोघांनीही पुणे शहर पुणे जिल्हा अथवा महाराष्ट्र राज्य यांचेकडील संबंधीत प्राधिकारी यांना शस्त्राबाबत माहिती कळवलेली नसल्याने आढळुन आल्याने त्याबाबत त्यांना विचारपुस करता त्यांनी कोणालाही कळविले नसल्याचे सांगितले आहे. तसेच त्यांना देण्यात आलेले परवाने हे स्वसरंक्षणार्थ दिले असताना ते त्यांनी खाजगी सुरक्षारक्षक म्हणुन त्याचा वापर केल्याचे आढळुन आल्याने त्यांचे कडील दोन रिव्हॉल्व्हर व सोळा जिवंत काडतुस असा दोन लाख सोळा हजाराचा माल पोलीसांनी तपासकामी जप्त करुन ताब्यात घेतलेला आहे. दोघांनीही शस्त्र नियम सुधारणा सन.२०१६ चे कलम १७ (१) अन्वये ६० दिवसाचे आत ज्या ठिकाणी शस्त्राचा वापर करणार आहे. तेथील प्राधिकारी यांचेकडे माहिती देणे बंधनकारक व आवश्यक होते परंतु ती माहिती दिलेली नाही. **तसेच त्यांना शस्त्रपरवाना हा स्वसंरक्षणासाठी दिलेला असताना त्याचा वापर त्यानी खाजगी सुरक्षारक्षक (बाऊन्सर) म्हणुन नोकरी करण्यासाठी करुन त्यापोटी वीस हजार ते पंचवीस हजार रुपये पगार घेत असल्याचे आढळुन आलेले आहे.** त्यांनी भारतीय शस्त्र कायदयातील परवाना नियमांचा भंग केल्याचे आढळुन आले आहे. म्हणुन त्यांचे विरोधात शस्त्र नियम सन - २०१६ चे कलम १७ (१) तसेच भारतीय शस्त्र कायदा १९५९ चे कलम ३० व भादवी कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे व त्यांना दिनांक – ०४/१२/२०१६ रोजी अटक केली आहे. आरोपीकडे असलेल्या शस्त्र परवाण्याबाबत पोलीस शहानिशा करुन तपास करत आहेत. **मा. अे. अेस. बारुळकर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सहावे पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. अशाप्रकारे जर कोणाला खाजगी सुरक्षा रक्षक (बाऊन्सर) म्हणुन कामास ठेवताना त्यांचेकडील शस्त्रे व शस्त्र परवाना वैध आहेत किंवा नाही याबाबत खात्री करावी असे पोलीस उपआयुक्त श्री सुधीर हिरेमठ यांनी लोकांना आवाहान केले आहे.**

**सदर कारवाई परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री सुधीर हिरेमठ, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. शरद उगले, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के व जे. डी. पायगुडे तपास पथकातील सहा पोलीस निरीक्षक व्हि. डी. केसरकर, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी विजय कांबळे, अजय थोरात, बशीर सेय्यद, सर्फराज शेख, अजय थोरात, इम्रान नदाफ, संदिप कांबळे, मंगेश नांगरे, महेश कांबळे यांनी केली आहे.**